| लातूर | वर्ष ३४ वे | अंक २६५ वा | बुधवार, दिनांक १४ जानेवारी २०२६ | पृष्ठे ६ | किंमत १ रू.
RNI 47034/64

# लातूर समाचार

Email-dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक) कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

## मनसेला मुंबई उच्च न्यायालयाचा मोठा झटका

## बिनविरोध निवडीविरोधातील याचिका फेटाळली

**मुंबई/प्रतिनिधी : राज्यातील महानगरपालिका निवडणुकीच्या धामधुमीत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला (मनसे) कायदेशीर आघाडीवर मोठा धक्का बसला आहे. पालिका निवडणुकीतील उमेदवारांच्या बिनविरोध निवडीला आव्हान देणारी मनसे नेते अविनाश जाधव यांची याचिका मुंबई उच्च न्यायालयाने फेटाळून लावली आहे. केवळ याचिका फेटाळलीच नाही, तर चुकीची माहिती देऊन न्यायालयाची दिशाभूल केल्याबद्दल खंडपीठाने याचिकाकर्त्यांना चांगलेच धारेवर धरले.**



आज सकाळी जेव्हा या याचिकेचा उल्लेख झाला, तेव्हा ही याचिका आधीपासून प्रलंबित असलेल्या इतर याचिकांसारखीच असल्याचे न्यायालयाला सांगण्यात आले होते. मात्र, सुनावणी सुरू झाल्यावर ऑनलाईन उपस्थित असलेले ज्येष्ठ वकील असीम सरोदे यांनी स्पष्ट केले की, ही याचिका इतर प्रलंबित प्रकरणांसारखी नसून थेट निवडणुकीशी संबंधित आहे. याचिकाकर्त्यांच्या या परस्परविरोधी विधानांमुळे मुख्य न्यायाधीश एस. चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती गौतम ए. अंखड यांचे खंडपीठ कमालीचे संतप्त झाले.

**न्यायालयाने सुनावले खडे बोल**

खंडपीठाने याचिकाकर्त्यांच्या वकिलांना जाब विचारत म्हटले की, सकाळी तुम्ही ही याचिका इतर याचिकांसारखीच असल्याचे चुकीचे विधान केले. मात्र, या दोन्हीमध्ये कोणतेही साधर्म्य नाही. एखाद्या पक्षकारासाठी अशी चुकीची माहिती देण्यामागे तुमची कोणती घाई किंवा भीती होती? चुकीची माहिती दिल्याबद्दल न्यायालयाने सुरुवातीला याचिकाकर्त्यांना दंड ठोठावण्याचे संकेत दिले होते.

**दंडाची टांगती तलवार टळली, पण याचिका फेटाळली**

न्यायालयाने सुरुवातीला दंडात्मक कारवाई करण्याची भूमिका घेतली होती, मात्र दीर्घ युक्तिवादानंतर न्यायालयाने दंड न आकारण्याचा निर्णय घेतला. असे असले तरी, बिनविरोध निवडीच्या प्रक्रियेत हस्तक्षेप करण्यास नकार देत न्यायालयाने अविनाश जाधव यांची ही याचिका फेटाळून लावली आहे.

**भाजपचे सर्वाधिक उमेदवार बिनविरोध**

राज्यातील २९ महानगरपालिकांमध्ये मतदान होण्यापूर्वीच ६६ उमेदवार विजयी झाले आहेत. यामध्ये भाजपचे सर्वाधिक ४४, शिंदेंच्या शिवसेनेचे १९ उमेदवार विजयी झाले आहेत. उमेदवार बिनविरोध निवडून आल्याने राजकीय वर्तुळात उलटसुलट चर्चा सुरू होत्या. मनसेने या प्रक्रियेवर कायदेशीर आक्षेप घेतला होता. मात्र, आता उच्च न्यायालयाने ही याचिका फेटाळल्यामुळे या जागांच्या बिनविरोध निवडीचा मार्ग मोकळा झाला असून मनसेसाठी हा मोठा कायदेशीर पराभव मानला जात आहे.

## जिल्ह्यात आदर्श आचारसंहिता लागू

### लातूर जिल्हा परिषद आणि १० पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर

**लातूर/प्रतिनिधी** : राज्य निवडणूक आयोगाने लातूर जिल्हा परिषद आणि त्याअंतर्गत असलेल्या लातूर, औसा, रेणापूर, चाकूर, अहमदपूर, उदगीर, जळकोट, निलंगा, शिरूर अनंतपाळ व देवणी सर्व १० पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. त्यामुळे या क्षेत्रांमध्ये आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आली असून, ही आचारसंहिता निवडणुकीचा निकाल जाहीर होईपर्यंत अंमलात राहील, असे जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत कळविण्यात आले आहे.

राज्य निवडणूक आयोगाने घोषित केलेल्या कार्यक्रमानुसार १६ जानेवारी २०२६ रोजी निवडणुकीची अधिसूचना प्रसिद्ध होईल. १६ जानेवारी ते २१ जानेवारी २०२६ पर्यंत सकाळी ११ ते दुपारी ३ पर्यंत या कालावधीत नामनिर्देशन पत्रे स्वीकारली जातील. १८ जानेवारी रोजी सार्वजनिक सुट्टी असल्याने अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. तसेच २२ जानेवारी २०२६ रोजी नामनिर्देशन पत्रांची छाननी होईल. २३, २४ आणि २७ जानेवारी २०२६ रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत अर्ज मागे घेता येतील. २७ जानेवारी २०२६ रोजी दुपारी ३:३० नंतर निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी व चिन्ह वाटप होईल. मतदान ०५ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ७:३० ते संध्याकाळी ५:३० पर्यंत मतदान होईल. मतमोजणी ०७ फेब्रुवारी २०२६ रोजी होणार आहे. ही निवडणूक प्रक्रिया शांततेत आणि पारदर्शकपणे पार पाडण्यासाठी जिल्हा प्रशासन सज्ज असून जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी याबाबत नियुक्त सर्व नोडल अधिकारी यांची आढावा बैठक घेवून आवश्यक सूचना दिल्या आहेत.

## मतदानाचे राष्ट्रीय कर्तव्य बजावण्याचा दिवस, मतदानासाठी कामगारांना भरपगारी सुट्टी व सवलत

### मतदानासाठी सवलत न दिल्यास कारवाईचा इशारा

**लातूर/प्रतिनिधी** : दि.१५ जानेवारी रोजी विविध शहरात महानगरपालिकांसाठी होणाऱ्या निवडणुकीत मतदारांना निवडणुकीसाठी पगारी सुट्टी अथवा सवलत दिली जावी,असे परिपत्रक राज्य शासनाच्या उद्योग, ऊर्जा, कामगार व खणीकर्म विभागाने काढले आहे.ज्या आस्थापना अशा सुट्ट्या देणार नाहीत त्यांच्याबाबत तक्रार प्राप्त झाली तर कारवाई करण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

प्रत्येक मतदाराला मतदान करता यावे यासाठी राज्य शासन विविध उपाय योजना करत आहे.मतदान जनजागृतीही केली जात आहे. एकही मतदार आपल्या मतदानाच्या हक्कापासून वंचित राहू नये, यासाठी ज्या क्षेत्रात मतदान आहे त्या क्षेत्राच्या मर्यादेत सुट्टीही जाहीर करण्यात आली आहे. शासकीय कर्मचाऱ्यांना तसेच विविध खाजगी आस्थापनांनाही हा नियम लागू आहे. मात्र यापूर्वी काही आस्थापनांनी सुट्टी देण्यास टाळाटाळ केल्याचे निदर्शनास आले आहे.

विविध आस्थापनांनी कामगारांना व कर्मचाऱ्यांना मतदानासाठी सुट्टी द्यावी. संबंधित व्यक्ती अत्यंत महत्त्वाच्या कार्यात असेल आणि सुट्टी देणे शक्य नसेल तर किमान काही वेळासाठी सवलत देणे आवश्यक आहे. त्यामुळे सर्व आस्थापनांनी कामगारांना मतदानासाठी सुट्टी किंवा सवलत द्यावी. ज्या आस्थापना सुट्टी देणार नाहीत त्यांच्यावर कारवाई करण्याचे निर्देश शासनाने दिले असल्याची माहिती लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने देण्यात आली.



# सुसंस्कृत लातूर शहर एक नंबर राहण्यासाठी काँग्रेसला मतदान करा; बाहेरील माणसाच्या हातात महापालिका देवू नका

## माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांची सत्ताधाऱ्यांवर टीका

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर शहर हे शैक्षणिक हब बरोबर व्यापारी मोठे केंद्र म्हणून विकसित झालेले असून या शहरात माझ्या काळात क्रीडा संकुल शहरातील विविध रस्ते ,वॉकिंग ट्रॅक करण्याचा प्रयत्न केला आहे मागच्या अडीच वर्षांपासून शहरात महापालिकेतील भोंगळ कारभार व सत्ताधाऱ्यांकडून शहरातील नागरिक व्यापाऱ्यांना त्रास होत आहे त्यासाठी आगामी महापालिका निवडणुकीत बाहेरच्या सत्ताधाऱ्यांना परत पाठवून देवुन लातूर सुसंस्कृत विकास भिमुख शहर म्हणून एक नंबर राहील यासाठी आगामी महापालिका निवडणुकीत काँग्रेस वंचित आघाडीच्या सर्व उमेदवारांना विजयी करा असे आवाहन राज्याचे माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख साहेब यांनी केले ते सोमवारी दुपारी लातूर येथील मोती नगर येथे आयोजित




सुसंवाद बैठकीत ते बोलत होते

**कोविड काळात अमित देशमुख राजेश टोपे यांचे कामाचे कौतुक**

देशात कोविड काळात जीव धोक्यात घालून तत्कालीन मंत्री राजेश टोपे अमित देशमुख यांनी जीव धोक्यात घालून लोकांसाठी रस्त्यावर येऊन काम केले हे आपल्याला विसरता येणार नाही उलट सत्ताधारी भाजप नेते चुकीची माहिती देवून लातूरकरांना भूलथापा देण्याचा प्रयत्न करत आहेत त्याला वेळीच रोखले पाहिजे असे सांगून शहरातील विविध रस्ते नाल्या विविध कामे खोळंबली आहेत ते पूर्णपणे महापालिका निवडणूक झाल्यानंतर आपली सत्ता आल्यानंतर सगळे प्रश्न आमदार अमित देशमुख खासदार डॉ शिवाजीराव काळगे सोडवतील यांची खात्री देवुन लातूरच्या विकासासाठी काँग्रेसला निवडून देण्याची गरज आहे त्यासाठी सर्वांनी आपले मतभेद विसरून लातूरच्या अस्मितेसाठी काँग्रेसला मतदान करा असे आवाहन माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांनी केले

**लातूरच्या अस्मितेला धक्का लावणाऱ्या पराभूत करा : उद्योजक निलेश ठक्कर**

लातूर ही सिटी सर्वधर्म समभाव विचार असलेला भाव इथे व्यापारी खरेदीदार उद्योजक मोठया प्रमाणावर सुरू आहे इथे आजपर्यंत लोकनेते विलासराव देशमुख माजी मंत्री दिलीपराव देशमुख, यांनी अतिशय सूक्ष्म नियोजन पारदर्शकता ठेवून कार्य केले प्रतेकाना मदत केली आहे मात्र गेल्या चार पाच वर्षात शहरात जिल्ह्यात जो सत्ताधाऱ्यांनी धुमाकूळ घातला आहे त्याला वेळीच रोखले पाहिजे हीच योग्य वेळ आली असून लातूरचे लोकनेते विलासराव देशमुख साहेब यांच्या अस्मितेला धक्का देणाऱ्या भाजपा नेत्यांना येणाऱ्या निवडणुकीत पराभव करून काँग्रेस वंचित आघाडीला बहुमतांनी निवडून द्यावे असे आवाहन त्यांनी यावेळी केले

**ट्रीपल इंजिन आमचे ठक्कर यांची टीका**

यावेळी उद्योजक निलेश ठक्कर यांनी ट्रिपल इंजिन हे काँग्रेसचे आहे खासदार आमदार आपलेच येणारी महापालिका आपलीच असेल त्यामुळे सत्ताधाऱ्यांना पराभूत करून लातूरच्या विकासासाठी काँग्रेसला निवडून द्या असे आवाहन ठक्कर यांनी केले.

यावेळी उद्योजक निलेश ठक्कर खासदार डॉक्टर शिवाजीराव काळगे, सीए कासट कमल किशोर अग्रवाल, अजय ठक्कर अशोकराव गोविंद पुरकर जेष्ठ समाजवादी नेते जेष्ठ पत्रकार सूर्यप्रकाश धुत जागृति शुगर चे संचालक दिलीप माने बाजार समितीचे माजी सभापती ललित शहा, अशोक गट्टू अग्रवाल, बाळासाहेब बिदादा ब आबासाहेब पाटील सेलूकर, संजय खानापुरे रवी अग्रवाल, पत्रकार हरिराम कुलकर्णी, पत्रकार चंद्रकांत झेरिकुंटे पत्रकार धर्मराज हल्लाळे, बसवंत भरडे सुनील कोटलवार परांडेकर, संभाजी रेड्डी शशिकांत कदम,संगमेश्वर पानगावें, बलदवा बांगड, लड्डा, महामुनी, नामदेव चव्हाण जितेंद्र स्वामी समर्थ पाटील, सिकंदर पटेल यांच्यासह व्यापारी खरेदीदार उद्योजक मोठया संख्येने उपस्थित होते

**परप्रांतीय कामगाराची हत्या; अल्पवयीन आरोपी ताब्यात**

**लातूर/प्रतिनिधी :** शहरातील सम्राट चौक परिसरात ''बाजूला सरकून बस''म्हटल्याच्या शुल्लक कारणावरून एका २९ वर्षीय परप्रांतीय कामगाराचा लाकडाने डोक्यात प्रहार करून खून करण्यात आला. लक्ष्मण विद जमादार (वय २९,रा. मडवा, जि. पाटणा, बिहार) असे मृताचे नाव आहे. याप्रकरणी गांधी चौक पोलिसांनी आरोपी अल्पवयीन मुलाला ताब्यात घेतले आहे.

## कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



**मनपाच्या निवडणूक प्रचार तोफा थंडावल्या...**

## चिमटा दयाचा



**लातूरच्या नागरिकांना विजयी कोण होणार याची उत्सुकता वाढली आहे ! सोळा तारखेला सायंकाळ पर्यंत सर्वांना कळणारच आहे !!**

## संक्रांत ..

भोगीसंक्रांतकिंक्रांत
त्रिखुशी करी साजरी
शिवार डोले सुखाने
गोड दिसते बाजरी

सणाले नावे विभीन्न
पोंगल मोघी किचेरी
निसर्ग राहतो फिदा
थंडीही लावी हजेरी

रहा सशक्त निरोगी
रे उर्जा असते जरुरी
खाण्यात करा बदल
सण सांगे खरोखरी

पावटा वांगे हरबरा
ताजी भाजी टोकरी
मिळेल चांगली उर्जा
खावी लोणी भाकरी

गोड गोड घांस चार
गरीबांचे जावे उदरी
पदपथी निजे कुणी
द्यावी उबदार चादरी

सणानिमीत्त दानधर्म
संधी ना भली दुसरी
आपपर भाव हो दूरी
संक्रांत येईल हसरी

इच्छा मरणाची पूर्ती
भिष्माचार्यशरपंजरी
मुक्तता मिळते अंति
तो सूर्यसंक्रमण करी

**हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६.

# हिंद–दी–चादर श्री गुरु तेग बहादूर यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित आयोजित कार्यक्रमांविषयी जिल्ह्यात होणार व्यापक जनजागृती

## जिल्हाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत क्षेत्रीय समिती सदस्यांची बैठक

**लातूर/प्रतिनिधी :** हिंद–दी–चादर श्री गुरु तेग बहादूर यांच्या ३५० व्या शहिदी समागम वर्षानिमित्त नांदेड येथे २४ व २५ जानेवारी २०२५ रोजी विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाच्या अनुषंगाने स्थापन करण्यात आलेल्या क्षेत्रीय समितीमधील लातूर जिल्ह्यातील अशासकीय सदस्यांची बैठक जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे यांच्या उपस्थितीत आज जिल्हाधिकारी कार्यालयात झाली. या कार्यक्रमाची माहिती घरोघरी पोहोचविण्यासाठी व्यापक जनजागृती मोहीम राबविण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी दिल्या. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना, लातूर शहर महानगरपालिका आयुक्त श्रीमती मानसी, उपजिल्हाधिकारी गणेश पवार, सायली ठाकूर, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी असलम तडवी, जिल्हा नियोजन अधिकारी सोमनाथ रेड्डी, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी आशिषकुमार अय्यर, माध्यमिकचे शिक्षणाधिकारी डॉ. दत्तात्रय मठपती, प्राथमिकच्या शिक्षणाधिकारी तृप्ती अंधारे यांच्यासह अशासकीय सदस्यांची उपस्थिती होती.

नांदेड येथे होणाऱ्या कार्यक्रमासाठी लातूर जिल्ह्यातील जास्तीत जास्त नागरिक उपस्थित राहावेत, यासाठी जनजागृतीवर भर देण्याची गरज आहे.




विविध शाळा महाविद्यालयांमध्ये श्री गुरु तेग बहादूर यांच्या जीवनावर आधारित माहितीपट, गीत दाखविण्यात यावे. तसेच ग्रामीण भागातील वाड्या–वस्त्यांवर या कार्यक्रमाची माहिती पोहचवावी, असे जिल्हाधिकारी यावेळी म्हणाल्या. जिल्हास्तरावर या कार्यक्रमाच्या अनुषंगाने सोपविण्यात आलेली जबाबदारी सर्व संबंधित अधिकारी, कर्मचारी यांनी प्रभावीपणे पार पाडावी, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

# मतदान करा, लोकशाही बळकट करा; लातूर महानगरपालिकेतर्फे भव्य 'बाईक रॅली'द्वारे जनजागृती




**लातूर/प्रतिनिधी :** लातूर शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५–२६ च्या पार्श्वभूमीवर, मतदारांमध्ये जागृती निर्माण करण्यासाठी 'स्वीप' (डतएएझ) कार्यक्रमांतर्गत आज शहरात भव्य 'मतदान जनजागृती बाईक रॅली' उत्साहात पार पडली. या रॅलीचे उद्घाटन लातूर शहर महानगरपालिकेचे उपायुक्त मा. डॉ. पंजाबराव खानसोळे यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून करण्यात आले.

रॅलीचा मार्ग आणि उत्साह

गुरूवार, १३ जानेवारी रोजी सकाळी ८.०० वाजता गरूड चौक येथून या रॅलीचा प्रारंभ झाला. यावेळी मनपाच्या विविध विभागांतील कर्मचारी आणि अधिकारी मोठ्या संख्येने आपल्या दुचाकींसह सहभागी झाले होते. रॅलीच्या माध्यमातून शहरातील विविध प्रभागांतून फिरत असताना उत्सव लोकशाहीचा, हक्क बजावू मतदानाचा, तजढए कर, लातूरकर अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला होता.

अधिकाऱ्यांचे आवाहन

यावेळी बोलताना उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे म्हणाले की, लोकशाहीमध्ये प्रत्येक मत मौल्यवान आहे. आगामी निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढवण्यासाठी आणि प्रत्येक नागरिकाला आपल्या मतदानाच्या हक्काची जाणीव करून देण्यासाठी या रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे.

प्रमुख वैशिष्ट्ये:

उद्देश: जास्तीत जास्त नागरिकांना मतदानासाठी प्रवृत्त करणे.

सहभाग: मनपा कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद आणि शिस्तबद्ध रॅली.

मतदान तारीख: १५ जानेवारी २०२६ रोजी होणाऱ्या मतदानासाठी या रॅलीद्वारे नागरिकांना आवाहन करण्यात आले.

या उपक्रमामुळे शहरातील नागरिकांमध्ये मतदानाबाबत सकारात्मक वातावरण निर्माण झाल्याचे पाहायला मिळाले. मनपाच्या या प्रयत्नांचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

# रोटरी क्लब ऑफ लातूर मिट डाऊन तर्फे प्रवीण शिवणगीकर यांचा उत्कृष्ट व्यवसायिक सेवा पुरस्काराने गौरव

**लातूर/प्रतिनिधी :** येथील रोटरी क्लब ऑफ लातूर मिट डाऊन यांच्यावतीने देण्यात येणारा २०२५– २६ सालचा उत्कृष्ट व्यवसाय सेवा पुरस्कार लातूर येथील राजा नारायणलाल लाहोटी इंग्लिश स्कूलचे रजिस्ट्रार श्री प्रवीण शिवणगीकर यांना प्रदान करण्यात आला.

राष्ट्र उभारणीमध्ये प्रामाणिक, निष्ठावान व मूल्याधिष्ठित व्यावसायिक कार्य करणाऱ्या व्यक्तींची योगदान अत्यंत मोलाचे असते. अशा व्यक्ती आपल्या व्यवसायिक जीवनाच्या माध्यमातून राष्ट्राच्या आर्थिक उन्नती मध्ये अमूल्य योगदान देत असतात त्यांचा सन्मान या पुरस्काराच्या रूपाने करण्यात येतो.

श्री किशन सोमाणी विद्यालयाच्या कस्तुर कांचन सभागृहामध्ये सदगुरू गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.



यावेळी डॉ हरिप्रसाद सोमाणी,ड श्रीराम देशपांडे उपस्थित होते.

प्रवीण शिवणगीकर यांच्या यशाबद्दल श्री मारवाडी राजस्थान संस्थेच्या विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष श्री लक्ष्मीरमण लाहोटी, संस्थेचे अध्यक्ष श्री शैलेश लाहोटी, सचिव बाजपेई सर शाळेचे चेअरमन श्री आनंद लाहोटी, त्याचबरोबर सर्व संस्था पदाधिकारी, शिक्षक व कर्मचाऱ्यांनी त्यांचे कौतुक केले आहे.

# पदयात्रांच्या माध्यमातून लातूरात कमळाचा जयघोष

## आ. निलंगेकर, आ. पवार, आ. कराड, डॉ. सौ. चाकूरकर यांचा सहभाग

**लातूर/प्रतिनिधी :** प्रचाराच्या अखेरच्या दिवशी भाजपाच्या वतीने शहराच्या विविध भागात पदयात्रा काढण्यात आल्या. निवडणुक प्रमुख माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर, आ.अभिमन्यू पवार, आ. रमेशप्पा कराड, डॉ. सौ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांच्यासह मान्यवर नेते आणि सर्व उमेदवार या पदयात्रामध्ये सहभागी झाले. यामुळे शहरात सर्वत्र कमळाचा जयघोष ऐकू येत होता.

सर्वच प्रभागात पदयात्रा काढत भाजपाने मंगळवारी प्रचाराचा समारोप केला. सायंकाळी पाच वाजता प्रचार थंडावला. प्रचाराचा अखेरचा दिवस असल्याने सकाळपासूनच उमेदवार, नेते आणि पदाधिकाजयांची लगबग दिसून येत होती. विविध ठिकाणी बँड, ढोल–ताशे, हालगी, पारंपारिक वाद्यांच्या गजरात पदयात्रा निघाल्या. गळ्यात भाजपचे गमजे, डोक्यावर टोप्या आणि हातात कमळाचे चिन्ह घेतलेले हजारो पदाधिकारी पदयात्रामुळे मंगळवारी लातूर शहरातील रस्त्यांवर दिसून येत होते.

पदयात्रांच्या माध्यमातून उमेदवारांनी अखेरच्या दिवशी मतदारांशी थेट संपर्क व संवाद साधला. मतदान अवघे एक



दिवस राहिले आहे. शहराचा विकास आपल्याला साधावयाचा आहे. त्यासाठी भाजपाच्या उमेदवारांना मोठ्या मताधिक्याने विजयी करा, असे आवाहन उमेदवारांनी मतदारांना केले.

आ. संभाजी पाटील निलंगेकर यांच्यासह मान्यवरांनी बहुतांश पदयात्रांमध्ये सहभाग नोंदवला. पदयात्रांच्या समारोप प्रसंगी मार्गदर्शन करताना आ. निलंगेकर म्हणाले की, संक्रातीच्या करीवर मतदान होणार आहे. बुधवारी तिळगुळ देवून सर्वांचे तोंड गोड करा. गुरुवारी करीच्या दिवशी भाजपाच्या कमळाचे बटन दाबून विजयी करा. शहराच्या विकासाची ही संधी वाया घालवू नका. भाजपा हा एकमेव पक्ष गतीने विकास करू शकतो. केंद्र आणि राज्यातील सरकारांचे पाठबळ भाजपाच्या नगरसेवकांना व महापौरांना मिळणार आहे. याचा फायदा सामान्य लातूरकरांना होणार असल्याचे ते म्हणाले. आ. अभिमन्यू पवार यांनी मुख्यमंत्र्यांचे हात बळकट करण्याचे आवाहन केले. लातूरवर मुख्यमंत्र्यांचे विशेष प्रेम आहे. त्यामुळे लातूरच्या विकासासाठी राज्याची तिजोरी खुली करण्याची त्यांची तयारी आहे. लातूरच्या जनतेने दूरदृष्टीचा विचार करत भाजपाला विजयी करावे, असेही त्यांनी सांगितले.

आ. रमेशप्पा कराड यांनी भाजपा लातूरचा विकास करण्यासाठी निवडणूकीच्या रिंगणात उतरलेला असल्याचे सांगत विकास हाच पक्षाचा ध्यास असल्याचे मत व्यक्त केले. भाजपाची सत्ता आली तर लातूरचा कायापालट होईल. लातूरकर विकासाशी जोडले जातील, असेही ते म्हणाले.

डॉ. सौ.अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी लाडक्या बहिणींना व भावांना साद घालत आपले हीत पाहून मतदान करण्याचे आवाहन केले. भाजपा हा राष्ट्रीय विचारांचा पक्ष आहे. राष्ट्रप्रथम या संकल्पनेनुसार देशहीत व जनहिताला या पक्षात प्राधान्य दिले जाते. लातूरात उद्योग–धंद्यांची उभारणी, मोठ्या शहरांशी कनेक्टीव्हीटी तसेच मुलभूत सुविधांच्या विकासासाठी भाजपा हाच योग्य पर्याय असल्याचेही डॉ. सौ. चाकूरकर यांनी सांगितले.

मागील पंधरा दिवस सुरु असणारा प्रचार मंगळवारी सायंकाळी थांबला. गुरुवारी सायंकाळी मतदान सुरु होणार आहे. यावेळची निवडणूक लातूरात परिवर्तन घडविणारी आणि विकासाच्या वाटेवर घेवून जाणारी असल्याच्या प्रतिक्रिया सामान्य नागरिक आणि मतदारांनी व्यक्त केल्याचेही ऐकावयास मिळाले.

निलंगा शहरातील
एलआयसी
विमा भरण्याचे केंद्र
सितारी विमा सेवा केंद्र
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स,
जनता दवाखान्यासमोर
शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क
Off: (02384) 242224,
9422612239,
9422658396

Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी–५२/२४–२६